पय ३१०५
. नं. ३२८
१८७०

पूज्य

... स्वागतोत्सवानिमित्त

सुंदर सुरम्य

# पद्यसुमनमाला.

स्व रा- ज्या



वि ष यीं

यंदा हीच

मकर संक्रांतीची मनोरंजक हलव्याची भेट.

प्रकाशक

... शुक्रवार घ.नं.२० पुणें सि.

... सदाशिव १०२६ पुणें सि.

...क आणा.

REFBK-0001706
REFBK-0001706

# कर्त्यांचे प्रस्तावनेदाखल दोन शब्द.

शके १८३६ सालीं कर्त्यांनें आपली दरसालची पद्यरूपी मनोरंजक हलव्याची भेट जगापुढें पुस्तकरूपानें मांडली होती. सद्यस्थितीप्रमाणें ज्यांना ती रुचली त्यांनीं तिचा आदर केला. पुनः ३९|१८४० सालीं पुस्तक वगैरे महागाईसंबंधानें काढण्यास सवड झाली नाहीं. यंदा तर सर्वप्रकारें आर्य-भू-माता पिकूनही धारण विलक्षण महाग विकून राहिली आहे. अन्नदारांचे कुटुंबांचें पोषण परमेश्वर कसें करणार समजत नाहीं ? दयाळू सरकारानें कंट्रोल बसवून काय केले ? उलट महागाई झाली आहे. सर्व मध्यम स्थितीचे अन्नदार हिंदवासियांना मोठी पंचाईत पडली आहे. स्वराज्याशिवाय कोणत्याही एका गोष्टीस आळा घालता येणार नाहीं; करितां लोकमान्यादि पुढाऱ्यांचे कृतीस यश देऊन परमेश्वरानें आम्हां हिंदवासियांना स्वराज्याचे पूर्ण हक्क लौकर द्यावे, तरच आम्हांस भाकरी सुखानें मिळेल; हीच त्या जगनियंत्याला प्रार्थना आहे. व यंदा हीच भेट सर्वांस देतो.

हें पुस्तक चित्रशाळा छापखान्याचे मालक रा. शं. न. जोशी यांनीं विशेष महागाई झाली असतांही अगदीं अल्प मूल घेऊन वेळेवर छापून दिलेबद्दल त्यांचे आभार मानून हे प्रस्तावनेदाखल शब्द पुरे करितों.

REFBK-0001706
REFBK-0001706

ग्रंथालय
क्र. १८७०६

आमचे परमपूज्य मातुल कैलासवासी श्रीमंत
सरदार काशीनाथराव नीळकंठ खाजगीवाले



यांची विलक्षण धर्मश्रद्धा, ईशभक्ति, भयंकर करारी स्वभाव, काटकपणा, व सर्वांवर सारखें उत्कट प्रेम वगैरे सद्गुणांचे स्मरणार्थ ही अल्प सेवा परमेश्वरार्पण करितों.

# पदांची अनुक्रमणिका.



| पृष्ठ | पदानुक्रम | पदांचीचाल | को० नाट० |
|---|---|---|---|
| १ | १ श्री मंगल० | दिसे कितितारे | विकल्पविमोचन |
| ,, | २ हे भवभुवन० | यानव नवल | मानापमान |
| ,, | ३ तुजविण अन्यन | तवमुख निरखुनि | वीरतनय |
| ,, | ४ सज्जना मी पुन्हा | पावना वामना | सौभद्र |
| २ | ५ होमरूल बहु | जयकृष्णातटवासा | शारदा |
| ३ | ६ हा अर्ज सुना | सुनो सुनाजि मेरे | सन्मित्र समाज |
| ४ | ७ ह्या लोक० | नृपममतारामावरती | रामराज्य वि० |
| ५ | ८ पुनरपी बालरवी | चलारे गणराया वंदा | सन्मित्र समाज |
| ,, | ९ केला लोभ अपार | थोरतुझे उपकार | ... .... |
| ६ | १० ज्ञान भान० | रीति अशी दिसते | लीलावती |
| ,, | ११ सद्गुरु पालक | अरसीक किति हा | सौभद्र |
| ७ | १२ शृंगार मातला | यमपाश गळ्यासी | शारदा |
| ,, | १३ जार्ज भूपते | (भैरवी) राम पाहिला | रामराज्य |

१७०६ काव्य

॥ श्री ॥

# ॥ ईशप्रार्थना ॥

## पद १ लें.

श्रीमंगलप्रिय जाये ॥ माये ॥ ये ये ॥ मम रसना करिं पावन सदये ॥ मंगलप्रिय० ॥ श्रीमंगल० ॥ ध्रु० ॥ मनुजजन्म हा सफल कराया ॥ जगीं सुकीर्ती यश तें द्याया ॥ समर्थ म्हणुनी चरणकमलिं तव लीन दास हा भो विधितनये ॥ मंगल० ॥ १ ॥

## पद २ रें.

हे भव-भवन-भुवनेश्वरा । झणि करिं मंगल हें वरदवर भैरवा भयद भवितसंहारा ॥ हे भव०॥ध्रु०॥ भक्तजनांच्या सदिच्छेला । धारा देईं दयाळा । सकलहि दुःस्थिति ने विलयाला । सुल्ट वाहुंदे बारा ॥ हे० ॥१॥ मिलिंद अन्तर चरणसरोजीं । शरणांगत या भक्तवरा । भार तयांचा घेउनि सारा । तारक हो संसारा॥हे०॥२॥

## पद ३ रें.

तुजविण अन्य न भूषवि जगांत ॥ पतीतपावन करिं हरि क्षणांत॥ध्रु०॥भवभ्रम वारोनि,यश देउनि,स्वांत शांत करिं चरणीं॥ धन्य हो मग, निशिदिनिं तव गुण नारोतनु न गात ॥ तुज० ॥१ ॥

## पद ४ थें.

सज्जना । मी पुन्हा । सालना । करीतसें हि आदरीं सुदीनिं प्रार्थना । ही सुदीनि प्रार्थना । मी सुदीनिं०॥ध्रु०॥ जनिं रसनाऽ-मधुवचना। सकल करित मनरंजना ॥करी०१॥त्या सुंदरलाऽ ग्रहण कराया । पदार्थ केला मकर-सणा ॥ करी० ॥ २ ॥

# संक्रांतीनिमित्त शके १८३९।१८४० चा सुयोग.

## पद ५ वें.

होमरूल बहु खासा । हलवा हा मधुतरसा ।
लोकमान्य धन्य असा ॥ होमरूल० ॥ ध्रु० ॥
स्वच्छ ऐक्यपाकाला । मलिनभाव नच शिवला ॥
कुशल सुमति सदतीला । घेउनि करिं हालविला ।
केशरि वरि रंग भला । खुललासे सुखकरसा ॥ हो०॥१॥
दैवयोग हा ऐसा-। कामधेनु गृहिं येसा ।
कीं चिंतामणि परिसा- । सम लाभवि हा तैसा ।
हिंदीनो ! हितकरसा । दवडुं नका फुकट असा ॥हो०॥२॥
हिंदभाग्यभानु सबळ । वाढ घेइ तीळ तीळ ।
ऐसा हा सुदिन काळ । म्हणुनि आज होमरूल- ।
तिळगुळ हा बहु प्रेमळ । सेवुं सकल सुजन बसा ॥हो०॥३॥
मेवा हा सेवाया । अक्षयिं दे प्रभुराया ।
हिंद-बाल सुखवाया । माय-बाप तूं सदया ।
अन्य कोण करि माया । तुजवांचुनि करुणेशा ॥ हो०॥४॥
संमति दे प्रभु–राया । होमरूल-संघा या ।
क्रांत दान्त भो सदया । बाल येति तव ठाया– ।
तीळगूळ सेवाया– । हिंदींची जी मानिषा ॥ हो० ॥ ५ ॥
सुचिर सुयश तव गाया । क्रांतीच्या या समया– ।
योग्य कालिं सुखवाया । हिंदबाल तूं माया–।
गत वैभव करिं द्यावा । योग येइ आज असा ॥हो०॥६॥
दैन्यदशा शतकवरी ह्मणवुनि जो स्वजनापरी ।
अन्यदेशिगमन करी । धन्य बाल पुण्यनगरीं– ।
मिळवुनि यश–सुफल करिं–। येऊं दे जगदीशा ॥हो०॥७॥

## यंदाचा शके १८४१ साळचा हलवा.

### पद ६ वें.

हा अर्ज सुनो जगपाल ।

चन्ड हा काल कां आझुनि ? ॥ चन्ड० ॥ धृ० ॥

संप्रती धान्य बहु पिकुनी ।

क्रांत हें दैन्य जनिं द्विगुणी । रे ।

तीं काळजि बुधजनिं थोर- ।

कल्पान्तसमय ये दिसुनी ॥ कल्पां० ॥ हा० ॥ १ ॥

रिक्त हो आमुचा देश ।

तारिं रे तारिं जगदीश । रे ।

भेटवी स्वराज्य-सुखास- ।

टीळक धुरिणवच मानी ॥ टीळक० ॥ हा० ॥ २ ॥

चारि हे खंड मनसोक्त- ।

सुख घेति हिंद-व्यतिरिक्त । रे ।

योग्य हा प्रभो करिं न्याय- ।

गत वैभव दे परतोनी ॥ गत० हा० ॥ ३ ॥

---

१७०६

# लोकमान्य टिळकांचा आम्हीं सर्व हिंदी गौरव कां करितों ?

## पद ७ वें.

ह्या लोकमान्य सत्पुरुषा ।। करिं शतायुषी परमेशा ।। बहुपरी ।।धृ०।। हा दीन हिंदीचा प्राण ।। हा पुण्यनगरभूषण ।।बहुपरी।। करी विलायतेसी गमन ।। सुखरूप येई परतोन ।। बहुपरी ।। कलियुगीं कृष्णभगवान् ।। रक्षितो हिंद हे दीन ।। बहुपरी ।। तैं पांच पंडुनंदन ।। हे हिंदबाल बहुवर्ण ।। बहुपरी ।। पांचालि-हिंदिची तृष्णा ।। पुरविसी सख्या श्रीकृष्णा ।। ब० ।। [ चाल बदलून ] गीतेंत । मर्म हें सत्य । करी प्रख्यात । सकल वर्णाला । हिंद जनतेला।। हा कर्ममार्ग दावीला।। बहुपरी ।। १ ।। घे राजकुलिं न जन्माला ।। परि भोगिसि ऐश्वर्याला ।। बहु० ।। ह्या सकल हिंदिच्या काजा ।। झटतोसि म्हणुनि तूं राजा ।। बहु० ।। जैं कृष्णसखा अर्जुन ।। नरसिंव्ह कलियुगीं रत्न ।। बहु० ।। मज टिळकभक्त बहु दिसती ।। कुणि धर्म-भीमसम असती ।। ब० ।। हें स्वराज्य आपुले हातीं ।। तो सुयोगदिन लक्षीती ।। बहु०।। तें पूर्ण मिळेतों तृप्ति-।। नच पावती हिंदमनें तीं ।। बहुपरी ।। [ चाल बदलून ] श्रीहरी । पूर्ण झणिं करीं । हेतू अंतरीं । लोकमान्याचा । हिंद जनतेचा ।। तो भाग्योदय हिंदीचा ।। बहुपरी।।२।।

## पद ८ वें.

पुनरपि बालरवी आला ।। परदेशातें स्वतेज दावुनि आपुल्या देशाला ।। ध्रृ० ।। प्रभा हि शोभवि जगताला ।। दिपवुनि टाकी बालतेज हें असह्य नयनांला ।। पु० ।। १ ।। गेला कृष्णपक्ष सरला ।। निबीड तिमिरीं रजनी वेळीं भेसुर सर्वांला ।। पुन०।।२।। चिंता जाई विलयाला ।। हिंद जनांचे हक्क मिळाया प्रारंभचि झाला ।। पु० ।। ३ ।। अत्यानंदचि जनतेला ।। करिती उत्सव बलवंताचा सज्जन ये वेळीं ।। पु० ।। ४ ।। हिंदजन मिरविती ह्या प्रभुला ।। भक्त तयांचे मिलिंद, अंतर लाविति चरणाला ।। पु० ।। ५ ।। विनंती जगन्नियंत्याला ।। स्वराज्य सत्वर देइं धुरधर निववीं नयनांला । पु० ।। ६ ।। आमुचें आयुष दे बाला ।। नारायणसुत भिकू मागतो भीक प्रभो घाला ।। पुनरपि० ।। ७ ।।

---

## लोकमान्य टिळकांचे परमस्नेही तीर्थस्वरूप कै. श्रीमंत सरदार तात्यासाहेब खाजगीवाले.

यांचे आभारदर्शक–

## पद ९ वें.

केला लोभ अपार । अम्हावरी । सद्गुरुसम उपकार ।। ध्रृ ।।
म्हणुनी तुमचें स्मरण होतसे नित्यचि वारंवार ।। अम्हा० ।।१।।
प्रेम-भक्तिनें ज्ञान बोधिलें दक्षपणें अनिवार ।। अम्हा० ।। २ ।।
निर्व्यसनि हे बाल स्वधर्मी हेंचि तयांतिल सार ।। अम्हा० ।।३।।
धर्मपरायण सुकीर्ति गाजे हाचि तुझा उद्धार ।। अम्हा० ।। ४ ।।
नारायणसुत मातुलपद नमि भक्तियुक्त त्रिवार अम्हा० ।। ५ ।।

## नाहींतर हल्लीं सुधारणेच्या काळांत प्रोफेसर, सुसिक्षीत गुरू असे ही आहेत—

### पद १० वें.

ज्ञान भान नच जीर्ण वयांत। दिसे नवल परि ह्यांत ॥ खरोखर दिसे० ॥ ध्रु० ॥ सूज्ञ तरुण जन भुलति कसे हो। ज्ञानि पूर्ण जे जागिं उदयांत ॥ दिसे० ॥ १ ॥ दृश्य वीष हें कलुनि वळूनि। पाजिति कोमल शिशुहृदयांत ॥ दिसे नवल० ॥ २ ॥ घरीं दारिं हें वीष पसरुनी। ठेवुं पहाती शिशू कह्यांत ॥ दिसे० ॥ ३ ॥ विद्या-र्जेनिं संसर्ग निंद्य हो। अवलंबुनि ज्यावरी हयात ॥ दिसे० ॥४॥

### पद ११ वें.

सद्गुरु पालक त्यांना-।उपमासाजे, नच अन्यांना ॥ कोमल शिशुदेहांना। रक्षुनि ज्ञानामृत करि पाना ॥ स० ॥ ध्रृ० ॥ निर्मल विद्यादाना-। देतां वाटे आदर शिशुंना-॥ अपपरभाव न ध्याना। बहु प्रेमानें शिकवित ज्ञाना ॥ स० ॥ १ ॥ इंद्रियदमनें स्वमना। जिंकि तो गुरु जनकल्याणा-॥ पात्र जगीं सन्माना। कांपत दुर्जन धाकें नयना ॥ स० ॥ २ ॥ रमणिय सुंदर ललना। बिल-सत भुवनीं गोचर नाना-। परि मनिं मोह शिवे ना। जननि-भगिनि-सम मानि तयांना ॥ स० ॥३॥ इतर हे विसरुनि भाना। श्वाना-परि नर उदराभरणा-॥ लुप्तचि आधीन व्यसना। गुप्तचि परि ही देख शिशुंना ॥ स० ॥ ४ ॥ शिष्टासम जरि बहाणा। परि कळती हे ढंग जनांना। गुरु नच गुरूं हें कुरणा-। पाहुनि तोडिति गळबंधांना ॥ स० ॥ ५ ॥ माय न बहिणी ज्यांना। पालक शिक्षक हे अज्ञाना। ऐशा पदवीधरांना। प्रथमचि पूजा घेउनि बहाणा ॥ स० ॥ ६ ॥

१२।

REFBK-0001706

REFBK-0001706

## अन्नाचा दुष्काळ व नाटक सिनेमांचा सुकाळ.

### पद १२ वें.

श्रृंगार मातला फार करी बेजार सुधारककाळीं। हा करूं पातला अज्ञ शिशूमन होळी ॥धृ०॥ [ चा०बदल ] ॥ शृंगार रुचे सकलांही सांप्रति ॥ परि काय पचें शिशुला ही नच भिति ॥ तिळविचार नच सुकुला ही परिस्थिति ॥ [चा०पू०] ॥ शृंगारिं गार मन बहार होय अनिवार आग परि ओली ॥ तैं शरिरधनाची झालि राखरांगोळी ॥ १ ॥ नच सुधारणेचा काल खरोखर काळ आणिला सकळीं॥ ही दृश्य विघातक पद्धत जाळा समुळीं ॥चा०ब० ॥ शृंगार पुटांतुनि बाल झडकरी ॥ सोडवा शरिरधन रक्षा सत्वरी॥ अवलंबुनि विद्या धन हें ज्यावरी ॥ [ चा०पू० ] ॥ व्हा पालक शिक्षक प्रथम जितेंद्रिय वेळीं ॥ तरि सुमार्गशिक्षण शिशुदहां सांभाळी ॥ २ ॥ मग शक्ति-युक्तिची चाले जोड हि गोळी ॥ भूमंडलिं शोभा तरीच सांप्रत काळीं ॥ [ चा०ब० ] ॥ म्हणुनियां मुलां नच द्यावा वाचनीं ॥ श्रृंगार मुळीं नच यावा लोचनीं ॥ ही वाटे प्रथमाचि सर्वां कांचणी ॥ [चा०ब०] ॥ प्रतिबंध परी हा विद्यार्जनवयकाळीं ॥ सन्मार्गी मग दृढदेही आग हि न जाळी ॥ ३ ॥ श्रृंगार० ॥

### पद १३ वें.

भो जार्ज भूपते । धन्य । गाऊं गीत ते ॥ भो० ॥ धृ० ॥ तारक तूं तात जरी । बाल कोड पूर्ण करी । सकल दैन्य त्वरीत हरी । गाउं गीत ते ॥भो०॥ १ ॥ आज पासुनि रविमंडळ । वाढ घेई तिळ तिळ । तेवि हिंद भाग्य वेळ । खास दीसते ॥ भो० ॥ २ ॥ करुणाकर करुणेशा । राजेश्वर राजेशा। सफल करी सुजन अशा । जार्ज भूपते ॥ भो० ॥ ३ ॥

समाप्त.

१७०६

